| MHKO180007872022 | **किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५८/२०२२** |
| --- | --- |
| | सरोजनी रावसो गुरव, वगैरे ३ वि.कोणी नाही<br>CNR : MHKO180007872022 |

## आदेश

(दिनांक ०६ एप्रिल २०२३ रोजी पारित)

अर्जदार नं.१ ते ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

### अर्जदारातर्फे थोडक्यात हकीगत अशी की,

२. प्रस्तुत अर्जातील अर्जदाराचे थोडक्यात कथन असे आहे की, मयत दत्तात्रय बाळू गुरव हे अर्जदार यांचे भाऊ होय. दत्तात्रय बाळू गुरव हे दि.१२.०५.२०२१ इ.रोजी मयत झाले आहेत. दत्तात्रय बाळू गुरव व अर्जदार यांचे वडील बाळू रामा गुरव हे मयत आहेत. तसेच दत्तात्रय बाळू गुरव व अर्जदार यांची आई चंपाबाई बाळू गुरव या मयत झाले आहेत.

३. दत्तात्रय बाळू गुरव हे अविवाहीत मयत झालेले आहेत. त्यामुळे मयत दत्तात्रय बाळू गुरव यांना अर्जदार हे एकमेव सरळ व कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांचेशिवाय त्यांना अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत.

४. मयत दत्तात्रय बाळू गुरव यांचे कायदेशीर वारस या नात्याने अर्जदार हे वारस नोंदीसाठी संबंधीत कार्यालयामध्ये गेले असता संबंधीत अधिकारी यांनी त्यांना मे.कोर्टाकडून वारसा दाखला आणणेसाठी सांगितलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे, इत्यादी सर्व बाबी नमुद करुन वारसा दाखला मिळणेची विनंती अर्जदाराने केली आहे.

५. प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस "दै.महानकार्य " आवृत्ती मध्ये (निशाणी ८) दिनांक २१/०१/२०२३ रोजी प्रसिध्द करणेत आली. या कामी मयत यांचे दत्तात्रय बाळू गुरव यांनी दिलेल्या मृत्यु दाखल्याची मूळ प्रत (निशाणी ११) असा कागदोपत्री पुरावा आणि अर्जदार नं.१ सरोजनी रावसो गुरव यांचे सरतपासाचे शपथपत्र (निशाणी ९) व अर्जदारतर्फे श्री.परशराम शंकर गुरव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र (निशाणी १०) वर दाखल करण्यात आलेले आहे.

६. या कामी अर्जाचे स्वरुप व एकंदर पुरावा पाहता माझे समोर खालील नमुद मुद्दे उपस्थित होत आहे -

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे अर्जात नमुद मयत दत्तात्रय बाळू गुरव यांचे वारस आहेत असा दाखला मिळणेस पात्र आहेत का ? | ....होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## *कारणमिमांसा*

**मुद्दा क्र.१ व २ संदर्भात -**

७. या कामी अर्जदार नं.१ सरोजनी रावसो गुरव यांनी शपथेवर जबाब (निशाणी ९) दिलेला आहे. सदर जबाब अर्जातील कथनाला परिपोषक आहे. तसेच मयत दत्तात्रय बाळू गुरव यांचे मृत्युबाबत जन्म–मृत्यु, उपजत मृत्यु विवाह नोंदणी ग्रामपंचायत टाकळी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दिलेल्या मृत्यु दाखल्याची मूळ प्रत अनुक्रमे (निशाणी ११) असा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जास जाहीर नोटीस दिल्यावर कोणीही त्यास हरकत घेण्यास हजर झालेले नाही. अर्जदारांतर्फे सादर केलेल्या पुराव्यास

आव्हान देण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर पुरावा स्वीकारणे योग्य व संयुक्तीक होईल.

८. अर्जदार हे वर्ग २ मध्ये बहीणी येत असल्याने व वर्ग १ मध्ये वारस नसल्याने मयत दत्तात्रय बाळू गुरव यांचे अर्जदार नं.१ ते ३ हे वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. सदर परिस्थितीचा व प्राप्त पुराव्यांचा विचार करता प्रस्तुत अर्जदार नं.१ ते ३ यांना वारसा प्रमाणपत्र देणे योग्य व न्यायोचित होणारे आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ बाबत मी माझा निष्कर्ष होकारार्थी देत असून मुद्दा क्र.२ बाबत मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :-

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. अर्जदार नं.१ ते ३ हे मयत दत्तात्रय बाळू गुरव, रा.टाकळी, ता.शिरोळ यांचे वारस असल्याचे औपचारीकरित्या प्रमाणित करणेत येत आहे. व त्यांचे नांवे योग्य त्या कोर्ट फी स्टॅम्पवर वारसा दाखला (Heirship Certificate) देण्यात यावा.

३. अर्जदार यांनी दिवाणी नियम पुस्तीका (Civil Manual) चे प्रकरण १४ (Chapter XIV) प्रमाणे पुर्तता करावयाची आहे.

दि.०६.०४.२०२३ सही/-
कुरुंदवाड अ.अ.कुलकर्णी
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुरुंदवाड